**प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटी आर्टस् कॉमर्स अँड सायन्स कॉलेज**
**वेश्वी अलिबाग**
**वर्ष २०१७–२०१८**

Prabhakar Patil Education Society's Arts, Commerce & Science College Veshvi Alibag Raigad

# प्रभाविष्कार महोत्सव

## A Big Event

प्राध्यापक – विक्रांत वार्डे

**प्रस्तावना–**

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटी ही शिक्षण संस्था स्वर्गीय प्रभाकर पाटील यांच्या प्रेरणेतून, मा. आमदार भाई जयंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि संस्थेच्या कार्यवाह सौ. चित्रलेखा पाटील यांच्या परिश्रमातून बहरत चाललेली शिक्षणसंस्था आहे. ''इवलेसे रोप लावियले द्वारी, त्याचा वेलू गेला गगनावरी'' या ओळीप्रमाणे पी.एन. पी. एज्युकेशन सोसायटीचे छोटेसे रोपटे या दशकभरात यशाची अनेक शिखरे पादाक्रांत करत आहे

विदयार्थ्यांना समाजात आपली वेगळी ओळख निर्माण करून दयायची असेल तर शैक्षणिक विषयांसोबत इतर शिक्षण देणे महत्त्वाचे आहे आणि हिच गरज ओळखून प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीमध्ये प्रभाविष्कार या सांस्कृतिक सोहळयाची निर्मिती करण्यात आली

**प्रभाविष्कार**

२०१२–१३ या शैक्षणिक वर्षात प्रभाविष्काराची सुरूवात झाली. प्रभाविष्कार हा प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या संकुलात साजरा होणारा भव्य सांस्कृतिक सोहळा आहे. ज्यामध्ये संकुलातील सर्व उपसंस्था सांस्कृतिकरित्या सहभागी होतातविदयार्थ्यांचे कलाकौशल्य, खेळाडूवृत्तीला प्रोत्साहन मिळावे या हेतूने प्रभाविष्कार या महोत्सवाअंतर्गत अनेक स्पर्धा व कार्यक्रम आयोजित केले जातात. एकंदरीत प्रभाविष्कार या शब्दाची फोड प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीचा आविष्कार अशीही करता येईल

प्रभाविष्कार महोत्सव वैशिष्टये :–

कोणताही उपक्रम चालू करणे व त्याचा विस्तार वाढविणे यामागे संस्थेची दूरगामी उद्दिष्टये असतात.प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटी प्रभाविष्कार चालू करण्यामागे काही उद्दिष्टये ठेवली, जी भविष्यात नक्कीच संस्थेच्या नावाला यशोशिखरावर नेतील. यामुळेच प्रभाविष्कार यशस्वी महोत्सव ठरला. या महोत्सवाची प्रामुख्याने पुढील वैशिष्टये आहेत.

१. विदयार्थ्यांचे मनोरंजन :– वर्षभरात शैक्षणिक उपक्रम राबवत असताना, विदयार्थ्यांना काही काळ मनोरंजन व्हावे यासाठी प्रभाविष्कारमध्ये विविध उपक्रम घेतले जातात ज्यायोगे विदयार्थी एक्टभा करिक्युलम ॲक्टीव्हीटीमध्ये सहभागी होवून कॉलेज जीवनाचा आनंद घेवू शकतात.

२. विदयार्थ्यांचे कलागुण विकसित व्हावेत :– आजकालच्या युगात विदयार्थ्यांना अभ्यासाबरोबर इतर कौशल्य आत्मसात असणे ही काळाची गरज झाली आहे. असे कौशल्य विदयार्थ्यांना समाजात इतरांपेक्षा वेगळी ओळख निर्माण करून दयायला कारणीभूत ठरते. म्हणून प्रभाविष्कार
अंतर्गत विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम घेतले जातात. ज्यामध्ये शाळा, महाविदयालयांमधील विदयार्थी मोठया संस्थेने उत्साहाने सहभागी होतात.

३. विदयार्थ्यांमधील खेळाडू वृत्तीला प्रोत्साहन मिळावे :– संस्थेत शिकत असलेल्या विदयार्थ्यांच्या रूचींमध्येही फरक असतो. कुणाला सांस्कृतिक क्षेत्रात रस असतो तर कुणाली क्रिडाक्षेत्रात. विदयार्थ्यांना क्रिडाक्षेत्रात प्रोत्साहन मिळावे म्हणून अनेक क्रिडास्पर्धांचा समावेश प्रभाविष्कार अंतर्गत होतो. यामध्ये थाळी फेक, गोळा फेक, कबड्डी, खो खो ते क्रिकेट असे सर्व खेळ आयोजित केले जातात. हया मैदानी खेळांसोबत कॅरम, बुध्दीबळ, असे इनडोअर गेम्सही घेतले जातात. यासर्व खेळांमध्ये विदयार्थी मोठया प्रमाणावर भाग घेतात.

४. विदयार्थ्यांच्या बुध्दीमत्तेला प्रोत्साहन मिळावे :– संस्थेत शिकत असलेल्या विदयार्थ्यांना इतर बौध्दीक विषयांमध्येही रस असतो. जसे जनरल नॉलेज, निबंध, काव्य, वाङमय, वक्तृत्व या सर्व गोष्टी विदयार्थ्यांच्या बौध्दीक विकासासाठी अत्यंत उपयोगी ठरतात. यामुळेच
प्रभाविष्कार अंतर्गत प्रश्नमंजुषा, वक्तृत्व, निबंध स्पर्धा, काव्य लेखन, काव्य वाचन, अशा अनेक स्पर्धा आयोजित केल्या जातात. ज्यात विदयार्थी उत्साहाने सहभाग घेतात.

५. विदयार्थ्यांच्या कलाकौशल्यांना वाव देणे :— ''व्यक्ती तितक्या प्रकृती, तितक्या आवडी निवडी'' ज्या विदयार्थ्यांना कलाकुसरीच्या गोष्टींमध्ये रस आहे, अशा विदयार्थ्यांसाठी सुध्दा प्रभाविष्कारमध्ये 'सृजन' अंतर्गत दालन उपलब्ध करून दिले जाते. यामध्ये बालवाडी ते पदव्युत्तर शिक्षण घेणा—या सर्व विदयार्थ्यांचा सहभाग असतो. शिल्पकला, रांगोळी, टाकाऊ पासून टिकावू, पाककला, हस्तकला अशा अनेक कलाकौशल्यांमध्ये विदयार्थी आपली कला सादर करतात. अशा गोष्टींतील विदयार्थ्यांचा सहभाग व त्यांचे कौशल्य अचंबित करणारे असते.

६. प्रभाविष्कार एक आरसा :— संस्थेचा नावलौकीक व यश सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रभाविष्कार हा महोत्सव एक संस्थेचा आरसा म्हणून काम करते. या निमित्ताने आजूबाजूच्या परिसरातील लोक या महोत्सवात सहभागी होतात. संकुलामध्ये येतात. संस्थेने उभारलेल्या इमारती,
आजूबाजूचे वातावरण, सुखसोयी, संस्थेचे उपक्रम, विदयार्थ्यांचे कौशल्य या सर्वांचा परिचय या महोत्सवाच्या निमित्ताने सर्वांना होतो. त्यामुळे प्रभाविष्कार ख—या अर्थाने संस्थेच्या प्रसिध्दीसाठी कारणीभूत ठरतो.

७. फनफेअर व स्टॉल्स :— प्रभाविष्कारचा शेवटचा दिवस हा फनफेअरचा असतो. यामध्ये फूड स्टॉल्स, गेम्स स्टॉल्स, लकी ड्रॉ, सांस्कृतिक कार्यक्रम असा भरगच्च कार्यक्रम असतो. ज्यात प्रेक्षक म्हणून आलेले आजूबाजूच्या परिसरातील लोकही भाग घेवू शकतात. त्यामुळे, प्रभाविष्काराशी पर्यायाने संस्थेशी लोकांचा ''डायरेक्ट टच'' होतो. फनफेअरमध्ये शेवटी होणा—या महादांडीयामध्ये युवावर्ग मोठया प्रमाणावर सहभागी होतो.

८. अष्टपैलू महोत्सव :— एका महोत्सवामध्ये सांस्कृतिक, क्रिडा, शैक्षणिक बाबींचा समावेश करणं ही कौशल्याची व कौतुकाची बाब आहेप्रभाविष कारामध्ये कला, क्रिडा, शिक्षण या सर्व क्षेत्रांवर लक्ष दिले जाते त्यात विदयार्थ्यांचा, पालकांचा व इतर प्रेक्षकांचा सहभाग वाखाणण्याजोगा असतो. यामुळेच ख—या अर्थाने प्रभाविष्कारकडे ''अष्टपैलू महोत्सव'' म्हणून पाहता येईल

**प्रभाविष्कार कार्यपध्दती :—** प्रभाविष्कार हया महोत्सवाचे वाढत जाणारे स्वरूप पाहता प्रभाविष्कारच्या
निर्मितीच्या वेळीच एक कार्यपध्दती ठरविण्यात आली. ज्यामुळे एवढा मोठया महोत्सवाचे आयोजन व नियोजन करणे सुकर झाले. प्रभाविष्काराचे विविध विभाग पुढीलप्रमाणे :—

१. नियोजन विभाग
२. अर्थ विभाग
३. सांस्कृतिक विभाग
४. कला विभाग
५. क्रिडा विभाग

**विभागवार समित्या व त्यांची कार्ये :—**

प्रभाविष्कार महोत्साचे यशस्वीरित्या पार पाडावा म्हणून विविध समित्या स्थापन केल्या जातात. ज्या विभागावर कार्य करतात. प्रत्येक समिती आपापले कार्य जबाबदारीने व व्यवस्थित पार पाडते. त्यामूळे एकंदरित कार्य उत्तमरित्या पार पाडले जाते. त्या समित्या पुढीलप्रमाणे :—

**१. शैक्षणिक संकुल समिती** :— ही समिती एकंदर प्रभाविष्कार महोत्सवात होणा—या सर्व कार्यक्रमांवर देखरेख ठेवून असते. महोत्सवाबाबतचे सर्व महत्वाचे निर्ण या समितीद्वारे घेतले जातात. महोत्सवाचे एकंदरित स्परूप, तारखा तसेच इतर महत्वाचे विषय ही समिती पाहते. या समितीमध्ये संस्थेचे कार्यवाह, संस्थेचे प्रतिनिधी व प्रभाविष्कार प्रमुख यांचा समावेश असतो.

**२. प्रशासकीय समिती** :— संकुलात घेतल्या जाणा—या महोत्सवाची रचना, अंतर्गत कार्यक्रम व इतर प्रशासकिय कार्य या समितीद्वारे केले जाते. या समितीमध्ये संकुलातील सर्व शाळा, महाविदयालये व पदव्युत्तर महाविदयालयाच्या मुख्याध्यापक व प्राचार्यांचा समावेश असतो.

**३. कार्यकारी समिती** :— शैक्षणिक संकुल समिती व प्रशासकिय समिती यांजकडून कार्यकारी समितीची नेमणूक करण्यात येते. या समितीमध्ये कार्याध्याक्ष, कला प्रदर्शन प्रमुख, क्रिडा स्पर्धा प्रमुख, विज्ञान प्रदर्शन प्रमुख, सांस्कृतिक प्रमुख ही पदे नेमली जातात. या समितीद्वारे पुढील कामे केली जातात.

१. महोत्सवाअंतर्गत होणा—या विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमाच्या तारखा ठरवणे.
२. महोत्सवासाठी आवश्यक इतर लहान लहान समित्या वाटून देणे.
३. महोत्सवाचा एकंदरित बजेट सादर करणे व मंजूर करून घेणे.
४. महोत्सवासाठी आवश्यक स्टेज, मंडप, ध्वनी व्यवस्था, प्रकाशयोजना अशा तांत्रिक गोष्टी उपलब्ध करून घेणे.
५. संकुलातील शाळा, महाविदयालये यांच्या गुणदर्शनाच्या कार्यक्रमांची आखणी करून देणे.
६. महोत्सवासाठी रोजच्या दिवशी वेगवेगळे पाहुणे, कलाकार आमंत्रित करणे व त्यांची व्यवस्था करणे.
७. फन फेरअरच्या दिवशी गेम्स, स्टॉल, फूड स्टॉल इ. आयोजित करणे.

Patil Education Society's Arts Commerce & Science College Alibag Raigad

८. नेमून दिलेल्या समित्यांच्या कार्यावर देखरेख ठेवणे, नियंत्रण ठेवणे व सर्व कामांचा आढावा वरिष्ठांपर्यंत पोहोचवणे.

**४. प्रसिध्दि समिती** :— या समितीवर प्रभाविष्कार या महोत्सवाची जाहिरात व प्रसिध्दि सर्वदूर व्हावी यासाठी कार्य करण्याची जबाबदारी असते. महोत्सवाची जाहिरात करणारे बॅनर्स छापून योग्य ठिकाणी लावणे, बातमी वृत्तपत्रात देणे, कार्यक्रम पत्रिका छापणे व वितरित करणे. महोत्सवात सादर झालेल्या कार्यक्रमाची बातमी वृत्तपत्रात छापून आणणे अशी महोत्सव सुरू होण्याच्या आधीपासून संपेपर्यंत सर्व प्रसिध्दिचे कार्य ही समिती करते.

**५. इतर समित्या** :— वरील समित्यांच्या नियंत्रणाखाली काही उपसमित्या कार्य करत असतात. ज्यामुळे लहान लहान कामांकडेही व्यवस्थित लक्ष देता येते.

• स्टेज समिती :— स्टेजशी संबंधित सर्व कामे या समितीमधील सदस्यांतर्फे सांभाळली जातात. स्टेजची सजावट, स्टेजवर लागणारे साहित्य, टेबल्स, खुर्च्या हे सर्व या समितीद्वारे केले जाते.

• स्वागत समिती :— स्टेजवर उपस्थित होणा—या पाहुण्यांचे स्वागत व त्यासंबंधी कार्य ही समिती करते. पाहुण्यांसाठी शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह अशा सर्व गोष्टींची देखभाल या समितीद्वारे केली जाते.

• आयोजन समिती :— स्टेजवर पाहुण्यांच्या स्वागताचे निवेदन करणे, दिपप्रज्वलन, सूत्रसंचालन अशा सर्व गोष्टी आयोजन समितीद्वारे केल्या जातात.

• सांस्कृतिक समिती :— स्टेजवर सादर होणारे सर्व सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व नियोजन सांस्कृतिक समितीद्वारे केले जाते.

• शिस्त समिती :— महोत्सवाअंतर्गत होणारे सर्व कार्यक्रम सुरळीत पार पडावे व एकंदरित शिस्त रहावी म्हणून शिस्त समिती कार्य करते. यामध्ये प्राध्यापक, विदयार्थी कार्यरत असतात.

• क्रिडा समिती :— महोत्सवामध्ये क्रिडा विभागातर्फे घेण्यात येणाःया विविध क्रिडास्पर्धांचे आयोजन व नियोजन करण्यासाठी क्रिडा विभागाअंतर्गत वेगवेगळया समित्या नेमल्या जातात. त्या समित्या विशिष्ट खेळांचे नियोजनाचे काम पाहतात. उदा. थाळी फेक, क्रिकेट, लांब उडी इ.

• विज्ञान प्रदर्शन समिती :— संकुलातील सर्व शाळा व महाविदयालयांच्या विदयार्थ्यांच्या विज्ञान प्रदर्शनाचे नियोजन करण्याचे कार्य या समितीद्वारे केले जाते. प्रदर्शन स्थळाची सजावट, मांडणी इ. सर्व काम या समितीअंतर्गत होते

•कला प्रदर्शन समिती :— संकुलातील शाळा, महाविदयालयाच्या विदयार्थ्यांच्या कला प्रदर्शनाच्या नियोजनाचे काम ही समिती पाहते. विदयार्थ्यांचे पेंटिंग्ज, भित्तीपत्रके लावून घेणे, रांगोळीसाठी जागा आखून देणे, टेबल्स, खुर्च्या यांची मांडणी अशी सर्व कार्ये ही समिती पाहते.

• स्टॉल समिती :— महोत्सवाच्या शेवटच्या दिवशीचा फन फेअर ही सर्वांसाठी मनोरंजनाची मेजवानी असते. फनफेअरच्या दिवशी लोकांसाठी फुड स्टॉल्स, गेम्स स्टॉल, प्रोफेशनल स्टॉल्स मांडलेले असतात. अशा स्टॉल्सना आमंत्रण देणे व त्यांची व्यवस्था करून देणे. त्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे या सर्व गोष्टी स्टॉल समितीद्वारे करण्यात येतात.

• कुपन समिती :— फन फेरअरच्या दिवशी सर्वांना कुपनाद्वारे प्रवेश दिला जातो. त्या कुपन्सचे वाटप करण्यासाठी व हिशोब ठेवण्यासाठी कुपन समिती कार्य करते.

• फनी गेम्स व लकी ड्रॉ समिती :— फन फेअरच्या दिवशी स्टेजवर फनी गेम्स, पैठणी, लकी ड्रॉ असे विविध कार्यक्रम घेण्यात येतात. फन फेअरसाठी येणा—या लोकांच्या प्रवेश कुपन्स मधून लकी ड्रॉ काढण्यात येतो व त्यांना आकर्षक बक्षीसे दिली जातात. या सर्वांचे नियोजन या समितीद्वारे करण्यात येते.

• प्रायोजक समिती :— महोत्सव जेवढा मोठा तेवढा त्याचा खर्चही मोठा असतो. त्यामुळे महोत्सवासाठी लकी ड्रॉ, बक्षीसे यासाठी व इतर महत्त्वाच्या गोष्टींसाठी अर्थसहाय्य म्हणजेच प्रायोजकत्व मिळवून देण्याचे काम ही समिती करते.

Prabhakar Patil Education Society's Arts, Commerce & Science College Veshvi Alibag Raigad

• अल्पोपहार समिती :— पाहुण्यांचे व इतर मान्यवरांच्या अल्पोपहाराची व्यवस्था या समितीद्वारे केली जाते. यामध्ये चहापान, नाश्ता, जेवण इ. व्यवस्था असते.

• अर्थकारण समिती :— महोत्सवासाठी लहान गोष्टीपासून मोठया खर्चापर्यंत निधीची गरज असते. अशा खर्चाचा हिशोब ठेवणे व निधी पुरवण्याचे काम अर्थकारण समिती करते.

या सर्व समित्या आपापले काम जबाबदारीने पूर्ण करतात. त्यामुळे एकंदरित महोत्सव सुरळीत पार पडतो

**प्रभाविष्काराचे बदलते स्वरूप :—**

प्रभाविष्कार हा सांस्कृतिक महोत्सव २०१२—१३ पासून सुरू करण्यात आलाप्रत्येक वर्षी या महोत्सवाचे स्वरूप मोठे होत आहे. महोत्सवाचा पसाराही वाढत आहे महोत्सवाला हजेरी लावणा—या विदयार्थी व इतर प्रेक्षकवर्गाची संख्याही दरवर्षी वाढत आहे. महोत्सवातील तांत्रिक बाबी व इतर कार्यक्रमांच्या गुणवत्तेतही वाढ होत आहेप्रभाविष् कार या महोत्सवासाठी पहिल्या वर्षी आदेश बांदेकर, मिलिंद गुणाजी दुस—या वर्षी मंगेश देसाई, नंदू काळे असे सेलिब्रिटी तर तिस—या वर्षी अभिजीत कोसंबी, प्रसेनजीत कोसंबी, विरेंद्र प्रधान, आर्या आंबेकर, क्रिकेटपटू पॉल, मुक्ता दाभोळकर असे मान्यवरांनी हजेरी लावली त्यामूळे एकंदरितच महोत्सवाला ''ग्लॅमरस लूक'' यैऊ लागला आहे. महोत्सवाला सर्व थरांतून पसंती लाभू लागली आहे

• निष्कर्ष :—

प्रभाविष्कार महोत्सव यशाची प्रसिध्दिची उंची गाठत आहे. कलाकारांसाठी प्रभाविष्कार हे मोठे व्यासपीठ ठरत आहे. त्यामूळे भविष्यामध्ये हेच व्यासपीठ नामवंत कलाकार घडवणारे व्यासपीठ ठरेल अशी खात्री आहे. प्रभाविष्काराला हजेरी लावणा—या कलाकारांची संख्याही नक्कीच वाढेल. तांत्रिक बाबी व इतर गुणवत्तेच्यावावत महोत्सवाचा दरवर्षी वाढत जाणारा आलेख पाहिला, तर भविष्यात प्रभाविष्कार हा तांत्रिकदृष्टया ''मेगा इव्हेंट'' म्हणून ओळखला जाईल. आर्थिकदृष्या ही प्रभाविष्कारचे बजेट वाढत आहे. २०१२—१३ मध्ये १०००००/— मध्ये आयोजित होणारा महोत्सव ४०००००/— पर्यंत गेला आहे. भविष्यात हा महोत्सव आर्थिकदृष्याही अधिक सबळ होईल हे नक्की आहे. या सांस्कृतिक महोत्सवाचे वाढते स्वरूप व लोकांची पसंती पाहता भविष्यात प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटी हे जिल्हाचे सांस्कृतिक केंद्र बनेल यात शंका नाही.